रविवार, दि. १९ ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ६० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## सुरेल सुरांनी उजळली दिवाळी पहाट

### राजयोग धुरींच्या गायनाने मंत्रमुग्ध झाले जालनेकर




**जालना । प्रतिनिधी -** संस्कृती मंच, जालनातर्फे आयोजित १८ वी दिवाळी पहाट सुरांच्या सुमधुर लहरींनी उजळून निघाली. सुप्रसिद्ध युवा गायक राजयोग धुरी यांच्या स्वरांनी या दिवाळी पहाटेचा मंगल आरंभ झाला. त्यांनी राग अहिर भैरवमधील अलबेला सजन आयो रे या बंदिशीने कार्यक्रमाची सुरुवात करताच सभागृहात भावमय वातावरण निर्माण झाले.

यानंतर माझे माहेर पंढरी, वृंदावनी वेणू, हे सुरांनो चंद्र व्हा, नाथ हा माझा, काटा रुते कुणाला, ऐसी लागी लगन, घेई छंद मकरंद अशा एकापाठोपाठ एक भावपूर्ण गीतांनी श्रोत्यांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचा समारोप कानडा राजा पंढरीचा या भक्तिगीताने झाला, ज्यावर उपस्थित रसिकांनी उत्स्फूर्त टाळ्यांचा वर्षाव केला.

कार्यक्रमासाठी संवादिनीवर प्रवीण बांदकर, तबल्यावर सौरभ पैठणकर, पखवाजवर अक्षय शेवडे, व्हायोलिनवर प्रज्ञा देसाई, तर साईड रिदमवर उद्धव कुंभार यांनी साथ संगत करून कार्यक्रम अधिक सुरेल बनवला. नीता पानसरे यांनी प्रभावी निवेदनाद्वारे कार्यक्रमाचा धागा घट्ट धरून ठेवला. सुरुवातीला किशोर देशपांडे यांनी प्रास्ताविक केले तर शेवटी उपस्थितांचे आभार संजय देशपांडे यांनी मानले.

संस्कृती मंचच्या पदाधिकाऱ्यांनी परंपरेप्रमाणे यावर्षीही उत्कृष्ट आयोजन करत जालना शहरातील दिवाळी पहाटेची १८ वर्षांची उज्वल परंपरा अधिक समृद्ध केली. सुरेल गायन, भावनांनी ओथंबलेले सूर आणि रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने ही दिवाळी पहाट यंदाही अविस्मरणीय ठरली.

## धम्मसाधना बुद्धविहाराच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही - भास्कर दानवे

### आबांना सोबत घेऊन बुद्ध विहाराच्या विकासासाठी निधी आणणार - आ.कुचे

**जालना । प्रतिनिधी -** धम्मसाधना बुद्धविहार, गणेशनगर-योगेशनगर, जालना या विहाराच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही. माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे व मा.आ. नारायण भाऊ कुचे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री मा.ना. देवेंद्रजी फडणवीस तसेच सामाजिक न्याय मंत्री मा.ना. संजयजी सिरसाठ यांच्याकडे पाठपुरा करून निधी आणून धम्मसाधना बुद्ध विहाराचा सर्वांगीण विकास करू असे वर्षावास समारोपानिमित्त चिवरदान व धम्मदेशना कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर बदनापूर विधानसभा मतदार संघाचे आमदार नारायणभाऊ कुचे, भंतेजी राजरत्न, धम्मसेविका सौ. वाघमारे आई, संस्थानचे अध्यक्ष दिलीपजी शिंदे, सचिव प्रमोदजी डोंगरदिवे, मा.जिल्हा सरचिटणीस देविदास देशमुख, स्वीय सहायक राजेश जोशी, सुभाष दिघे, भाजपा महानगर जिल्हा चिटणीस सुमित सुरडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

धम्मसाधना बुद्ध विहाराच्या सर्वांगीण विकासासाठी भास्कर आबांना सोबत घेऊन शासन स्तरावर पाठपुरावा करून भरघोस निधी खेचून आणू या बुद्ध विहाराच्या सर्वांगीण विकासाला आपला हातभार लावणार असे आमदार कुचे यांनी बोलताना सांगितले.




यावेळी बोलताना भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, धम्मसाधना बुद्ध विहारामध्ये आपणास भगवान गौतम बुद्धांचे पंचरत्न करूना याचा साक्षात्कार होतो व प्रत्येक व्यक्तींनी जीवनामध्ये या पंचरत्नांचे काटेकोरपणे पालन केल्यास आपले ध्येय साध्य होते तसेच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पंचरत्नाचे काटेकोर पालन करून जीवनाचे ध्येय साध्य केले. माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या माध्यमातून रु.५० लक्ष चा निधी मंजूर करून आणला असून उर्वरित कामासाठी लागणाऱ्या निधी करिता मा.दानवे साहेब आ.कुचे साहेब, मा.आ.कैलासजी गोरंट्याल साहेब यांच्या माध्यमातून शासन स्तरावर पाठपुरावा करणार असून उर्वरित विकास कामे त्या निधीतून पूर्ण केली जातील असे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ.दीपक भालेराव, अरुण डोंगरदिवे, प्रफुल शिंदे, श्री.गायकवाड सर, श्री.तुपे सर, श्री.साळवे सर, श्री.वाघ सर इत्यादीसह मोठ्या प्रमाणात माता भगिनी व वडीलधारी मंडळी उपस्थित होती.

युवा आदर्श

### फेक न्यूज ...

खोडसाळ महाभाग
फेक न्यूज फेकतात
वाटे केले महा कार्य
नभास हात टेकतात
पत्र कारिता विशुद्ध
स लाभार्थ विकतात
कुबुद्धि शक्ती पुढती
कंबरेमधून वाकतात
प्रसिद्धीसाठी हव्यास
मन मळभ ओकतात
ब्रेकिंग न्यूज मसाला
मना येई ते ठोकतात
उथळ तो शहाणपणा
अल्पबुध्दी झाकतात
ब्रह्मास्त्र मुळी पेलवेना
हताश शस्त्रे टाकतात
अल्प फायदा मलिदा
सच्चिदानंदा मुकतात
पट्टी बांधली डोळ्यांस
पदोपदो पथ चुकतात
जवळ जरी सुधाकुंभ
कोरडी तळे राखतात
सोडे आपले नंदनवन
शिळी फळे चाखतात
पातकांचेओझेअसह्य
वाहून उगाचं थकतात
अश्वमेध अश्वा त्यागून
गुराढोरां का हाकतात

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा झाडे जगवा

### २७ वर्षे खटला प्रलंबित राहिल्याने न्यायालयात आत्महत्या: ५ कोटी खटले, ३२४ वर्षांची प्रतीक्षा

## ‘तारीख पे तारीख’ कधीपर्यंत; नामदेव जाधवांना न्याय कधी मिळणार ? - अभय वर्तक

**छत्रपती संभाजीनगर -** ‘तारीख पे तारीख’ या दुष्टचक्रात २७ वर्षे अडकल्यानंतर न्यायाच्या प्रतीक्षेत हताश झालेल्या नामदेव जाधव यांनी पुणे न्यायालयाच्या इमारतीवरून उडी मारून आपले आयुष्य संपवले. ही आत्महत्या नसून दिरंगाईने आणि उदासीनतेने ग्रासलेल्या व्यवस्थेने केलेली ही हत्याच म्हणावी लागेल. अद्याप देशांतील न्यायालयांत ५ कोटींहून अधिक खटले प्रलंबित आहेत ते मार्गी लागण्यासाठी नीती आयोगाच्या मताप्रमाणे ३२४ वर्षे लागतील, म्हणजे अनेक पिढ्यांना व कोट्यवधी लोकांना न्याय मिळणारच नाही. अखेर ‘तारीख पे तारीख’ कधीपर्यंत चालणार, नामदेव जाधवांना न्याय कधी मिळणार, असा प्रश्न सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी सरकारला केला आहे.

श्री. वर्तक पुढे म्हणाले की, श्री. जाधव यांचा मृत्यू हा हिमनगाचे केवळ एक टोक आहे. आजमितीला देशभरातील न्यायालयांमध्ये तब्बल ५.३ कोटींहून अधिक खटल्यांचे डोंगर उभे आहेत. यातील सर्वाधिक म्हणजे ४.७ कोटी प्रकरणे जिल्हा आणि तालुका न्यायालयांमध्ये प्रलंबित आहेत. जिथे सामान्य माणूस न्यायासाठी पहिला दरवाजा ठोठावतो. धक्कादायक म्हणजे यातील १.८ लाखांहून अधिक खटले ३० वर्षांहून अधिक काळ आणि काही खटले तर ५० वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत.

या न्यायालयीन दिरंगाईच्या मुळाशी प्रशासनाची उदासीनता आहे. भारतात प्रति १० लाख लोकांमागे केवळ १५ न्यायाधीश कार्यरत आहेत, तर अमेरिकेत हेच प्रमाण १५० आणि युरोपात २२० आहे. कायदा आयोगाने अनेक दशकांपूर्वी प्रति दशलक्ष ५० न्यायाधीशांची शिफारस केली होती; पण आपण ते लक्ष्यही गाठू शकलेलो नाही. ऑक्टोबर २०२५ पर्यंत देशभरातील २५ उच्च न्यायालयांमध्ये न्यायाधीशांची २६ टक्के आणि जिल्हा न्यायालयांमध्ये ५,२०० हून अधिक न्यायाधीशांची पदे वर्षानुवर्षे रिक्त आहेत. रिक्त पदांमुळे कार्यरत न्यायाधीशांवर कामाचा प्रचंड ताण येतो, ज्यामुळे खटले निकाली काढण्याचा वेग मंदावतो आणि न्याय मिळण्यास विलंब होतो. न्यायव्यवस्थेसाठी होणारा खर्च तर देशाच्या एकूण जीडीपीच्या केवळ ०.०८% आहे, जो पायाभूत सुविधांच्या अभावातून स्पष्ट दिसतो.



नागरीकांचा न्यायावरील विश्वास उडू नये म्हणून सरकारने या समस्येला राष्ट्रीय आपत्ती मानून युद्धपातळीवर काम करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक खटला एका निश्चित कालमर्यादेत निकाली काढण्यासाठी राष्ट्रीय धोरण तयार करून त्याची कठोर अंमलबजावणी करणे, न्यायाधीशांचे संख्याबळ आंतरराष्ट्रीय मानकांनुसार वाढवणे, न्यायाधीशांची आणि अन्य सर्व रिक्त पदे केवळ भरणे, न्यायालयीन पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे, कायदेशीर प्रक्रियेत सुधारणा करणे आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. या सर्व कृती एकत्रित प्रयत्न केल्यास ‘सर्वांसाठी वेळेवर न्याय’ हे धोरण साध्य होऊ शकते, असेही श्री. वर्तक शेवटी म्हटले आहे.

## दिवाळीच्या सुट्ट्या वाढवण्याची मराठवाडा शिक्षक संघाची मागणी




**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी -** चालू शैक्षणिक वर्षामध्ये सुट्यांबाबत प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी ३०एप्रिल २०२५ रोजी पत्र काढले होते त्या दिवाळीच्या सुट्ट्या १६ ऑक्टोबर ते दोन नोव्हेंबर अशा एकूण १७ दिवस येतात मात्र नियमानुसार दिवाळीच्या सुट्ट्या २१ दिवस देणे आवश्यक आहे त्यामुळे दिवाळीच्या सुट्ट्या वाढवण्याची मागणी करणारे निवेदन मराठवाडा शिक्षक संघाचे जालना जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे व इतर पदाधिकाऱ्यांनी माध्यमिक शिक्षणाधिकारी बाळू खरात यांना दिली निवेदनानुसार माध्यमिक शाळा संहितेमध्ये २१ दिवस दिवाळीच्या सुट्ट्या द्याव्या लागतात १६ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर पर्यंत सुट्या दिल्या पाहिजेत त्यावर शिक्षणाधिकारी यांनी मागणीच्या संदर्भात तात्काळ कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले यावेळी मराठवाडा शिक्षक संघाचे उपाध्यक्ष जगन वाघमोडे, सहसचिव प्रद्युम्न काकड,गणेश मेहेत्रे व युवा शहराध्यक्ष सोहम बोदवडे आदींची उपस्थिती होती



दीपावली सणानिमित्त लक्ष्मीपूजन साठी विविध प्रकारचे साहित्य खरेदीसाठी मुख्य बाजारपेठेत महिलांची व पुरुषांची मोठ्या संख्येने गर्दी दिसून आली.

(छायाचित्र अनिल व्यवहारे)

# संपादकीय पान

## दिवाळी अंक म्हणजे पर्वणीच!

आपल्या देशात दिवाळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. आताही देशात दिवाळीची धामधूम सुरू आहे. वेगवेगळ्या वस्तूंच्या खरेदीसाठी बाजारपेठा फुलल्या आहेत. सर्वत्र दिवाळीच्या खरेदीची धामधून सुरू आहे. आकाशकंदील, मिठाई, फटाके, नवीन कपडे, नवीन वाहने, इलेक्ट्रॉनिक वस्तू यांच्या खरेदीसाठी दुकाने फुलून गेली आहेत. दिवाळीमुळे सर्वांच्या उत्साहाला उधाण आले आहे. दिवाळी म्हंटले की गोडाआधोडाचा फराळ, आकाशकंदील, पणत्या, नवीन कपडे, नवीन वस्तू असे जे समीकरण आहे तसेच दिवाळी म्हणजे दिवाळी अंक असेही समीकरण आहे. दिवाळी आली की वाचकांना वेध लागतात ते दिवाळी अंकाचे आणि वाचकांचे पाय आपसूकच दिवाळी अंकाच्या खरेदीसाठी पुस्तकांच्या दुकानाकडे वळतात. महाराष्ट्रात तर दिवाळी अंकाची परंपरा खूप पूर्वीपासून आहे. महाराष्ट्रात पहिला दिवाळी अंक १९०९ साली प्रसिद्ध झाला होता. त्याचे नाव मनोरंजन असे होते. पहिला दिवाळी अंक प्रसिद्ध होऊन आज ११६ वर्ष झाली आहेत. आपल्या राज्यात दरवर्षी विविध विषयांवरील दर्जेदार दिवाळी अंक प्रसिद्ध होतात. महाराष्ट्रात जवळपास हजाराच्या आसपास दिवाळी अंक प्रकाशित होतात. दरवर्षी त्यात नव्या अंकाची भर पडतेच. दिवाळी अंक म्हणजे वाचकांसाठी मेजवानीच. कला, क्रीडा, साहित्य, राजकारण, अर्थकारण, विनोद, कथा, कादंबरी, कविता, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, आहार, व्यंगचित्र, भविष्य, चित्रपट, नाटक अशा विविध विषयांवरील दिवाळी अंक वाचणे म्हणजे पर्वणीच. अनेक वृत्तपत्रे आपल्या वाचकांसाठी दिवाळी अंक काढत असतात. यावर्षीही अनेक वृत्तपत्रांनी आपल्या वाचकांसाठी दिवाळी अंक काढले आहेत. फटाके, मिठाई, फराळ यासोबतच दिवाळी अंक ही सुशिक्षित आणि साहित्यप्रेमी घरांसाठी एक आवश्यक घटक आहे. मधल्या काळात दिवाळी अंकांना घरघर लागली होती. कोरोना काळात दिवाळी अंकाच्या छपाई आणि वितरणाला मर्यादा आल्या होत्या. त्यामुळे तुलनेने कमी दिवाळी अंक प्रसिद्ध झाले होते. असे असली तरी काही संपादकांनी आणि प्रकाशकांनी आपले अंक ऑनलाईन प्रसिद्ध केले होते. वाचकांना ते डिजिटल प्लॅटफॉर्म वर उपलब्ध झाले होते. काहींनी आपले अंक पीडीएफ स्वरूपात उपलब्ध करून दिले होते. वाचकांनी त्याची प्रिंट काढून ते वाचले होते. कोरोनाचे दुष्चक्र संपल्यानंतर दिवाळी अंकांना पुन्हा सुगीचे दिवस आले. यावर्षी अनेक संपादकांनी आणि प्रकाशकांनी आपले दिवाळी अंक वाचकांसाठी उपलब्ध करून दिले आहेत. काहींनी ऑडिओ आणि व्हिज्युअल दिवाळी अंकही बाजारात आणले आहेत. वाचक पूर्वीच्याच उत्साहाने दिवाळी अंकाचे स्वागत करीत आहे. दिवाळी अंक आपल्या साहित्य संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. दिवाळी अंकामुळे वाचन संस्कृती रुजायला खूप मदत झाली आहे. वाचन संस्कृती रुजवण्यात आणि नव्या पिढीला वाचन संस्कृतीकडे घेऊन जाण्यात दिवाळी अंकांचा मोलाचा वाटा आहे. यावर्षी आपण आपल्या नातेवाईकांना आणि मित्र परिवाराला दिवाळीच्या शुभेच्छा आणि फराळासोबत दर्जेदार दिवाळी अंक भेट द्यावीत. वाचनाची गोडी वाढवण्यासाठी दिवाळी अंक हा चांगला मार्ग आहे. गोडाधोडाच्या फराळासोबतच वाचनाचा हा फराळही दिला तर दिवाळीची गोडी आणखी वाढेल आणि वाचन संस्कृती टिकायलाही मदत होईल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# समाधानाचे वरदान दीपोत्सव...

**तेजोमय दीपोत्सव समृद्धीचे दान !! मनामनात नांदो सुखशांती समाधान !!**

वसुबारसपासून सुरू झालेला यावेळचा दीपोत्सव तितकाच उत्साह आणि आत्मविश्वास घेऊन आलेला आहे. या दीपोत्सवात मिणमिणाऱ्या पणतीपासून ते आकाशातल्या आतषबाजीतून उत्साहाची ऊर्जा ओसंडून वाहताना दिसते. छोट्याशा पणतीतून टीचभर वात पण मनामनातल्या अंधारावर प्रचंड मात करते. त्या पणत्यांकडे पाहिल्यानंतर मनातले नैराश्य सहजपणे पिटाळले जाते. आपल्या शक्ती आणि कुवतीप्रमाणे ही छोटीशी पणती आपल्या आजुबाजूचा अंधार दूर करते. आणि लांबवरच्या पांथस्थालासुद्धा आशेचा किंवा आत्मविश्वासाचा किरण दाखवते. खरे तर दीपोत्सवाचा हाच मोठा संदेश ठरतो. कितीही संकटं आली, आव्हानं आली तरीसुद्धा न डगमगता आपल्या शक्ती आणि कुवतीप्रमाणे प्रकाशाचा मार्ग शोधता येतो. आणि आपल्याच आत्मविश्वासातून आकाशालाही गवसणी घालता येते. अशा प्रकारचा उत्साह आणि ऊर्जा देण्याचे काम या दीपोत्सवाच्या माध्यमातून होते. कोणताही संकल्प किंवा उद्दिष्ट साध्य करायचे असेल तर प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागतेच. हे प्रयत्न करताना येणाऱ्या अडचणींना शरण न जाता त्यातून मार्ग काढता येतो. आणि स्वतःबरोबर इतरांसाठीदेखील सहाय्यभूत होता येते. म्हणूनच पणती किंवा आकाशकंदीलातील प्रकाश हा आत्मविश्वास जागवणारा असतो. विशेष म्हणजे मन आणि शरीराचा निसर्गाशी समन्वय साधून एक अनोखे समाधानही प्राप्त करता येते. ही किमया फक्त भारतीय संस्कृतीतच पाहायला मिळते. कारण दूर डोंगरावरची एखादी झोपडी जरी असली तरी तिथे तेवणारा आकाशकंदील आणि गर्भश्रीमंतांच्या बंगल्यांवर लटकणारे आकाशदिवे या दोघांकडे पाहिल्यानंतर आनंद आणि समाधान समान स्वरूपात प्राप्त होते. म्हणजेच आपल्या मनाच्या व्यापकतेला आकाशाचे कोंदण प्राप्त करता येते. हेदेखील या दीपोत्सवाचेच अनोखे वैशिष्ट्य आहे. भारतासारख्या कृषीप्रधान देशात वसुबारसला होणारी गोधनाची पूजा किंवा आजची संपन्नतेचा विचार सांगणारी धनत्रयोदशी म्हणजे आपल्याकडे असलेल्या धनाविषयी आदर व्यक्त करण्याची मोठी संधी असते.

=९समृद्धीचे वरदान...

संपूर्ण दीपोत्सव हा समृद्धी आणि संपन्नतेचे वरदान देणारा असतो. आपल्याकडे जे आहे किंवा जे प्राप्त झाले आहे. त्याच्याविषयी कृतज्ञ राहून आनंदी राहण्याचा संस्कार हीसुद्धा मनाची समृद्धीच असते. स्वतःजवळ असलेल्या धनाचा विचार न करता अशाश्वत सुखाच्या मागे न धावता स्वतःमध्येच असलेल्या आनंदाला ओळखून समाधान प्राप्त करता येते. आणि याच प्रवृत्तीला संपन्नता किंवा संपत्ती म्हणता येते. भारतीय संस्कृतीने अन्य कोणत्याही भौतिक सुखापेक्षा विचार आणि संस्कारांच्या संपन्नतेला सर्वाधिक महत्त्व दिलेले आहे. आजची धनत्रयोदशी याच मनरूपी धनाचे स्मरण करणारी म्हटली पाहिजे. प्राचीन काळात आजच्यासारखे चलन किंवा पैसा अडका नव्हता. शेतीतून मि




ळणारे अन्नधान्य हीच संपत्ती मानली जायची. त्याचीच देवाणघेवाण होऊन समाजातले जीवन व्यवहार चालू असायचे. आणि हेच खरं धन आहे, असे मानून त्याचीच पूजाअर्चाही केली गेली. पुराणकथांमधून आजच्या दिवशी समुद्रमंथनातून धन्वंतरी देवता प्रकटली. तिच्या हाती अमृतकलश होता. म्हणजेच समाजाच्या आयुरारोग्यासाठी उपयुक्त असे अमृत धन्वंतरीने देवाधिकांना दिले होते. परंतु त्याचा मतितार्थसुद्धा हाच आहे की, समुद्राचं मंथन करून जगाच्या हितासाठी अमृत प्राप्त करता येते. भारतीय संस्कृती हीसुद्धा अशाच विचार आणि संस्कारांच्या माध्यमातून समाजहिताचे सण, उत्सव साजरे करणारी आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे सगळ्या प्रकारचे भेद मावळतात. आणि आनंदाचा समान अनुभव या दीपोत्सवातून किंवा सणउत्सवातून प्रत्येकाला घेता येतो. दीपावलीतले पणत्यांचे महत्त्व आजही का टिकून आहे. तर याचे रहस्यच हे सण उत्सव सामान्यातल्या सामान्य माणसाचा त्याच्या परिस्थितीचा विचार करणारे आहे. अशांचाही आत्मविश्वास दुप्पट करण्याचे काम या उपक्रमातून होत राहते. म्हटलं तर दीपोत्सव हा हिंदू संस्कृतीचा एक अविभाज्य सण ठरतो. तर दुसरीकडे हाच दीपोत्सव व्यापक अथनि संपूर्ण विश्वाला आनंदमय जीवन जगण्याचं रहस्य सांगून जातो. व्यक्ती किंवा मनुष्यजीवन म्हटल्यावर काही ना काही कारणांमुळे अपयश किंवा नैराश्य येण्याची शक्यता असते. परंतु त्याला कवटाळून न बसता सतत पुढे जाण्याचा किंवा आपले संकल्प सिद्ध करीत राहण्याची ऊर्जा या दीपोत्सवातून मिळते.

=९सातत्यपूर्ण शृंखला...

सलग पाच दिवस साजऱ्या होणाऱ्या या प्रकाशपर्वामध्ये प्रत्येक दिवसाचे एक आगळेवेगळे महत्त्व नोंदले गेले आहे. नरकचतुर्दशीच्या दिवशी पहाटेच्या अभ्यंगस्नानाचे महत्त्व सांगून स्वतःमधल्या आणि समाजातल्या विकृतींवर विजय मिळवण्याचा संदेश दिला जातो. बलिप्रतिपदेला संपत्तीचा अहंकार कसा घातक ठरतो, हे सांगून ज्यांच्यामुळे समृद्धी किंवा समाधान प्राप्त होते त्यांच्याविषयी कृतज्ञता आणि आदर ठेवण्याची शिकवण दिली गेली. म्हणूनच या दिवशी घरातल्या वडिलधाऱ्यांविषयी निष्ठा व्यक्त करण्याची संधी प्राप्त होते. भाऊबीजेला बहीण भावातल्या स्नेह आणि प्रेमाचा सर्वोच्च क्षण अनुभवता येतो. शिवाय समाजातल्या बंधुभावालादेखील नकळतपणे प्राधान्य मिळते. अगदी अश्विन अमावास्येच्या दिवशी होणारे लक्ष्मीपूजन म्हणजे सन्मानि प्राप्त केलेल्या लक्ष्मीची आराधना करण्याचा आणि ती तितक्याच चांगल्या कामासाठी विनियोग करण्याचा विचारही सांगितला गेला. या सगळ्यांमधून सारांशरूपाने एक सकारात्मक ऊर्जेचाच संस्कार दृढ होताना दिसतो. व्यक्तीपासून समाजापर्यंत प्रत्येकाने सामंजस्य आणि सहकार्याचेदेखील महत्त्व व्यक्त केले जाते. या काळात एकमेकांना दिल्या जाणाऱ्या शुभेच्छा म्हणजे भारतीय संस्कृतीने रूजवलेला सर्वत्र 'सुखिनः सन्तुचा' मूलभूत आविष्कार ठरतो. व्यक्ती आणि समाजातल्या जाणीवांना सतत प्रगल्भ करीत राहणे स्वार्थ संकुचितता नाहीशी करीत राहणे असा विचार दृढ करीत राहण्याची एक सातत्यपूर्ण शृंखला म्हणजेच दीपोत्सव ठरतो.

## त्रिशताब्दी जेष्ठ नागरिक मंडळचा वर्धापन दिन थाटात संपन्न




**नागपूर -** वर्षपुर्तीच्या निमित्ताने वर्धापन दिन व दिवाळी मिलनाचा कार्यक्रम त्रिशताब्दी जेष्ठ नागरिक मंडळ, नंदनवन नागपूरच्या वतीने साजरा करण्यात आला.यावेळी वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन पत्रकार रमेश लांजेवार यांनी केले व प्रास्ताविक विजयराव कुकडे यांनी केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष मधुकरराव बुचे होते व प्रमुख पाहुणे म्हणून दक्षिण नागपूरचे लोकप्रिय आमदार मोहनजी मते प्रामुख्याने उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या अनुषंगाने आमदार मोहनजी मते यांनी आपल्या भाषणात जेष्ठ नागरिकांसाठी ५० लाख रुपयांचा निधी उभारूनविरंगुळा केंद्र उभारण्याची मोठी घोषणा केली व लवकरात विरंगुळा केंद्र तयार करून ज्येष्ठांना संपूर्ण सुविधा उपलब्ध करून देण्याचे ठोस आश्वासन दिले.या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीमध्ये जेष्ठ नागरिक मंडळ फेस्कॉमचे सचिव प्रदीपजी डोंगरे, कोषाध्यक्ष सालफळे, महिला प्रमुख श्रीमती हरने मॅडम, हार्मोनियम वादक राजेशजी समर्थ, मंडळाचे सचिन विजयराव वाघ यांनी आपले मनोगत व्यक्त केले व आमदारांनी जलदगतीने विरंगुळा केंद्र उभारण्याच्या घोषणेचे स्वागत केले.या अनुषंगाने दर महिन्याला जेष्ठ नागरिकांचा वाढदिवस साजरा करण्यात येतो.त्या अनुषंगाने आमदारांच्या हस्ते ज्येष्ठ नागरिकांना पुष्पगुच्छ देऊन खालील जेष्ठांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.यामध्ये विजयराव बावणकर, अशोकराव तिडके,दीपकजी कोहळे,अनिलजी कुबडे, चंद्रकांतजी कोडापे,दीपकजी वाडिभस्मे,जनार्धनजी चरडे, विनोदजी मोहोड ,श्रीमती पुष्पाताई कुंभलकर,श्रीमती नलिनीताई बुलबुले,राजेशजी मोहोड ,अनिल गोळे इत्यादींचा वाढदिवस आमदारांच्या हस्ते साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाला प्रामुख्याने प्रमोद चौहान, संजय उ्कंडे, संजय तळमले,विलास काटोले,ओमप्रकाश टुले,हरिश्चंद्र बल्की, देवराव शेंडे,हरगोविंद भांडारकर,निलेश गुजर,बाबा व्यापारी, विजय कुकडे, सतीश चरडे,रवींद्र ढोमणे, रामकृष्ण ठाकरे, मनोहर ठाकरे,बाबाराव तायवाडे,विनोद ठाकरे,बाबा मोहिते, रामूजी सिंगनजुडे,विष्णू तळमले,एकनाथ चवरे, हरिभाऊ डहाके, मुकुंद मेहता,सुरेश वनवे,विजय कळमकर,आनंदराव खापरे, मुरलीधर जुमडे, श्रीकांत गहुकार, महल्ले इत्यादीसह मोठ्या संख्येने जेष्ठ नागरिक यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालक रमेश लांजेवार यांनी केले तर आभारप्रदर्शन सोनाली घोडमारे यांनी केले व कार्यक्रमाची सांगता झाली.


## इपीएफ ९५ हक्काची पेंशन देणार कि फसवणार ?

ईपीएस ९५ पेन्शन धारकांच्या पेन्शनची चेष्टा काँग्रेस काळापासून सुरु आहे,त्याला मोदींच्या काळात काही दिलासा मिळेल अशी आशा वाटत होती. मोदीजींनी आशेचे किरण दाखवून चेष्टेचे परमोच्च शिखर गाठले.विरोधी पक्षाबरोबर भाजपच्या खासदार अभिनेत्री हेमा मालिनी ह्यांनी मोदींची अनेकवेळा भेट घेवून पेन्शनधारकांची बिकट परिस्थिती विशद केली.संसदेत अनेक खासदारांनी आवाज उठविला. ज्या पेन्शनधारकांनी आपल्या आयुष्याची पुंजी भविष्यासाठी आसरा होईल म्हणून केलेली त्यांची गुंतवणूक मिळू नये ह्यासारखे दुर्दैव नाही. सरकारने पेन्शन फंडाची रक्कम गुंतवणूक केली त्याचे वार्षिक व्याजच एक लाख कोटी होते त्यातून ७५०० डीए वैद्यकीय भत्ता सहज देता येऊ शकतो. हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ असताना पंतप्रधान मोदीजी स्वतः म्हातारे झाले आहेत ते पीडित जेष्ठ नागरिकांची वाढीव पेन्शन देतो सांगून चेष्टा करतात.सुप्रीम कोर्टाने आदेश देऊन सुद्धा त्याची पायमल्ली करतात. कोर्टाच्या आदेशाला जुमानत नाही हा कोर्टाचा अवमान असून सुद्धा कोर्ट गप्प का बसते हा खरा चिंतेचा विषय आहे.वेळेपूर्वी राजीनामा देणाऱ्या जगदीप धनकडं ह्यांना दोन लाख पंच्याहत्तर पेन्शन कोणत्या अधिकारात दिली जाते.त्याची त्यांना खरंच तेव्हडी गरज आहे आहे काय ? राष्ट्रासाठी त्यांचे कोणते मोठे योगदान आहे ? पेन्शनधरी कर्मचारी हा मिळणाऱ्या पगाराच्या दुप्पट तिप्पट परतावा देतो. मोदीजीवर स्वतः वर दिवसाला किती कोटी खर्च होतात. त्याचा परतावा देशाला किती मिळतो ? जनतेच्या टॅक्स मधून लोकप्रतिनिधींना सर्व सुविधांनी युक्त अशी आर्थिक मेजवानीच मिळते. त्यात आर्थिक भ्रष्टाचार करून गब्बर होताना देशाची अर्थव्यवस्था बिघडवतात. त्यांनाही त्यांची लायकी नसताना पेन्शन मिळते, आणि ज्यांचे हक्काचे पैसे आहेत त्यांची गेली कित्येक वर्षे अवहेलना करताना ह्या सरकारला लाज वाटत नाही ? हातात सत्ता आहे आणि जेष्ठ पेन्शनर नागरिक हतबल आहेत त्यांची हक्काची पेन्शन देण्याची इच्छा नसेल,ती हडप करण्याचा डाव असेल व लोकसंख्या कमी करायची असेल तर सर्व पेन्शनधारकांना हिटलरने केले त्याप्रमाणे चेंबरमध्ये घालून ठार मारा. मोदी सरकार म्हणजे मेलेल्या माणसाच्या मढ्यावरचे लोणी नाही तर रक्त पिणारे पशु सरकार आहे. कमांडर अशोक रावत हे अतिशय विनम्र स्वभावाचे असून सामंजस्याने प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न गेली कित्येक वर्षे पेन्शनरांच्या हक्कासाठी झटत आहेत.त्यांना साथ देणारे राजेंद्र सिंग, प्रशांत तेंडुलकर आणि असे अनेक दिवसरात्र झटणारे समितिचे सदस्य व लाखो पीडित पेन्शनर ह्यांची मानसिकता निराशतेकडे वाढत चालली आहे. पेन्शनरांच्या हक्काची पेन्शन ठराविक काळात मिळाली नाही तर *गब्बर* सिनेमातल्या *गब्बर* प्रमाणे संबंधित प्रशाकीय अधिकारी, मंत्री ह्यांचे कपडे फाडून तोंडाला काळे फासून गाढवावरून धिंड काढावी. त्यासाठी तरुण पी. एफ. धारक कर्मचाऱ्यांनी ईपीएस पेन्शनधारकांना मदत करावी कि जेणेकरून सदर परिस्थिती भविष्यात त्यांच्यावर येऊ नये.

**यशवंत चव्हाण सीबीडी बेलापू**

# गोरगरीब, निराधारांसोबत दिवाळी साजरी करूया...

एकीकडे श्रीमंतांची दिवाळी धुमधडाक्यात, आनंदात व फटाक्याच्या आतिषबाजीत मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी होते. महागडे कपडे, रंगीबेरंगी हायफाय साड्या, आकाश कंदील, दिव्यांची रोषणाई, वेगवेगळ्या प्रकारचे अंगावर दागिने, हजारो रुपयांचे फटाके आणि चांगल्या क्वालिटीचे फराळाचे विविध पदार्थ बनवून श्रीमंतांची दिवाळी शाही थाटात साजरी होते. ही दिवाळी म्हणजे श्रीमंतांचाच सण आहे की काय? असे वाटते. श्रीमंतांनी शाही थाटात दिवाळी साजरी करायची आणि गरिबांनी त्यांचा थाट व रुबाब बघतच राहायचा, हे असे कसे चालणार? गोरगरीब, निराधार, शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर व वृद्धाश्रमात खितपत पडलेले ज्येष्ठ नागरिक यांची दिवाळी मात्र सालाचे बारा महिने सारखीच आहे. यांच्या जीवनातील दुःखाचा डोंगर नष्ट होऊन आनंदाचे क्षण कधी येतील? वाटत होते, यंदा पाऊस काळ चांगला झाला आहे, शेतकऱ्यांची व कष्टकऱ्यांची दिवाळी आनंदात साजरी होईल. परंतु नेमकीच शेतकऱ्यांच्या हातात आलेली सुगी अतिवृष्टीने हिरावून नेली. आणि शेतकऱ्यांचे अर्थचक्र पूर्णतः कोलमडून गेले. अवेळी धो धो बरसणाऱ्या पावसाने शेतकऱ्यांच्या आशा व अपेक्षा उध्वस्त करून टाकल्या. शेतकऱ्यांनी अगोदरच कर्ज काढून शेतात पेरणी केली होती. आणि आता त्यातच पावसाने शेतीची अवस्था बटबटीत करून टाकली आहे. त्यामुळे यंदा शेतकऱ्यांची दिवाळी गोड होईल, असे मला तर वाटत नाही. त्यासाठी श्रीमंतांनी गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी व शेतमजुरांचा विचार करून आपल्या कमाईतील काही हिस्सा शेतकऱ्यांना देऊन शेतकऱ्यांची दिवाळी गोड करावी. फूटपाथवर राहणारे, रस्त्याच्या कडेला राहणारे, पालात राहणारे आणि वृद्धाश्रमात व अनाथाश्रमात खितपत पडलेल्या गरजू व निराधार लोकांना आर्थिक मदत करून त्यांची दिवाळी गोड साजरी केली तर तुमच्या जीवनात निर्माण होणारा आनंद खरोखरच आगळावेगळा व अवर्णनीय असेल. परिवारा सोबत दिवाळी साजरी करण्यापेक्षा निराधारांसोबत दिवाळी साजरी करून त्यांच्या जीवनात आनंद निर्माण केला तर तुमच्या जीवनात आनंदाची मंगलमय पहाट उगवायला वेळ लागणार नाही. परिवारासोबत दिवाळी साजरी करण्यात आनंद तर आहेच पण गोरगरीब, निराधार, शेतकरी व शेतमजुरांसोबत दिवाळी साजरी करण्यात त्यापेक्षाही अधिक आनंद आहे. त्यासाठी ज्यांचे आर्थिक उत्पन्न जास्त आहे, अशा श्रीमंत लोकांना विनंती आहे की बाबांनो, वृद्धाश्रमात जाऊन तेथील वृद्धांना विविध प्रकारचे फराळ, नवेकोरे कपडे आणि इतर भेटवस्तू देऊन एक दिवस त्यांच्या समवेत दिवाळी साजरी करावी. अनाथांना, निराधारांना व शेतकऱ्यांना आपल्या परीने शक्य होईल तेवढी आर्थिक मदत करून त्यांची ही दिवाळी गोड करावी.. ज्यांना आई-वडील नाहीत अशा निराधारांना व अनाथांना अनाथाश्रमात जाऊन त्यांना आर्थिक व मानसिक आधार देऊन त्यांचे अश्रू पुसले तर खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली असे म्हणता येईल. पण एवढ्या दानशूर व उदार मनाचे परोपकारी माणसे आपल्या देशात खरंच आहेत का? असले तरीही त्यांच्या मनात गोरगरिबांप्रती व निराधारांप्रती सहानुभूती व करुणा आहे का? राजकीय क्षेत्रात, क्रीडा क्षेत्रात, कलाक्षेत्रात, चित्रपट क्षेत्रात आणि शासकीय क्षेत्रात मोठ्या पदावर विराजमान असणाऱ्या महान हस्ती आपल्या देशात खूप आहेत. त्यांच्याकडे गरजेपेक्षा जास्त पैसा आहे. त्यांच्या शेकडोपिढ्या त्या पैशावर बसून खातील एवढा अमाप पैसा व संपत्ती त्यांच्या नावे आहे. त्यांनी आपल्या कमाईतील थोडाफार पैसा गोरगरीब, निराधार, शेतकरी, कष्टकरी, दुःखी व पीडित लोकांच्या भल्यासाठी व कल्याणासाठी लावला तर आपला भारत देश प्रगतीचे आणखीन एक दमदार पाऊल टाकेल. हजारो रुपयांचे फटाके फोडून प्रदूषण करण्यापेक्षा, हजारो रुपये दारू व मटक्यावर उधळण्यापेक्षा, वाढदिवसावर भरमसाठ पैसा खर्च करण्यापेक्षा तोच पैसा दिवाळीच्या निमित्ताने वृद्धाश्रमांना, अनाथाश्रमांना, कर्जबाजारी शेतकऱ्यांना, दुःखी व पिढीत लोकांना आणि गरजू व निराधार लोकांना आर्थिक सहाय्य म्हणून दिला तर त्यांच्या जीवनात आनंदाचे क्षण व आनंदाचा गोडवा नक्कीच निर्माण होईल. आणि त्यांना मदत केल्याचा आगळावेगळा आनंद तुमच्याही जीवनात प्राप्त होईल. म्हणून यंदा दिवाळीच्या निमित्ताने संकल्प करूया की, आपल्याने शक्य होईल तेवढी आर्थिक मदत शेतकऱ्यांना, शेतमजुरांना, निराधारांना व गरजूंना करून त्यांच्या जीवनात आनंदाचे क्षण व आनंदाचा गोडवा आणून आपल्याही जीवनात आनंदाची पेरणी करूया...त्यासाठी शासनाची वाट बघत बसू नका.... शासन एकमेकांवर टीका करण्यात व एकमेकांच्या चुका शोधण्यात रममान झाले आहे..शासन शेतकऱ्यांना व निराधारांना मदत करेल याची शाश्वती कोणीही देऊ शकत नाही.. कारण आजकालचे सरकार गरिबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे न राहता श्रीमंतांच्या पाठीशी उभे राहत आहे.. त्यांना गरिबांपेक्षा धन दांडग्यांचीच जास्त काळजी असते... ज्या दिवशी सरकार तन-मन-धनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहुन शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेईल व शेतकऱ्यांना आर्थिक व मानसिक पाठबळ देईल त्यादिवशी आपला देश प्रगतीच्या उंबरठ्यावर असेल.



**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# देविदास शिंपले यांचे निलंबन मागे घ्या

मराठवाडा शिक्षक संघाची उपसंचालकांकडे मागणी



**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी-**
शिक्षक देविदास शिंपले यांचे करण्यात आलेले निलंबन मागे घेण्यात यावे अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव यांनी शिक्षण उपसंचालक यांच्याकडे केली आहे

परभणी येथील ज्ञानोपासक विद्यालय टाकळी तालुका मानवत येथील शिक्षक देविदास शिंपले यांनी समाज माध्यमावर सरकार विरोधात टीका केली म्हणून शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी निलंबित करावे असे आदेश काढले आहे.

शिक्षणधिकारी (मा) जि प परभणी यांनी देविदास शिंपले (सहशिक्षक) ज्ञानोपासक विद्यालय रामेटाकळी ता मानवत जि परभणी यांचे तत्काळ निलंबन करावे असे आदेश दिले आहे. समाजमाध्यमांवर बदनामी करणे, सरकारी धोरणावर टीका करने व शिक्षण विभागाच्या कारभारावर प्रश्न उपस्थित करणे अशी कारणे दिलेली आहेत.


स्वतंत्र भारतात शिक्षणाधिकारी यांचे आदेश म्हणजे रजाकारी आहे. टीका करणे मागणी करणे हे राज्यघटनेने दिलेला मूलभूत अधिकार आहे. या निर्णयामुळे त्या मूलभूत अधिकारावर गदा आणली गेली आहे.

व्यक्ती स्वातंत्र्याचा गळा घोटणारे शिक्षणाधिकारी परभणी यांचे पत्र तात्काळ रद्द करावे आणि त्यांच्यावर योग्य कारवाई करावी. अशा पत्रामुळे नवीन पायंडा पडेल आणि कर्मचाऱ्यांना याचा मानसिक व आर्थिक छळ होईल. म्हातारीच्या मरण्याचे दुःख नाही पण काळ सोकावून जाईल.

व्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी केल्याबद्दल शिक्षणाधिकारी यांच्यावर योग्य कारवाई करावी. उपरोक्त मागण्या तत्काळ मंजूर कराव्यात नसता मराठवाडा शिक्षक संघ आपल्या कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने अभिनव पद्धतीने आंदोलन करेल याची सर्व जबाबदारी आपल्या कार्यालयाची असेल असा इशारा सुर्यकांत विश्वासराव, (विभागीय अध्यक्ष), केंद्रीय कार्यकारणी उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, प्रा. डॉ. उमाकांत राठोड (सिनेट सदस्य), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर, चंद्रकांत चव्हाण (जिल्हा सचिव), जगन वाघमोडे (जिल्हा उपाध्यक्ष जालना), नवनाथ मंत्री अशोक ढमढेरे, विनोद केनेकर, विलास चव्हाण, कृष्णा गोंडे यांनी केली आहे.

# दिवाळी हा सण आनंदाचा, प्रकाशाचा व समृद्धीचा - हरिभक्त परायण विठू माऊली

**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी** - दिवाळी कशी साजरी करावी त्याचे महत्त्व दिवाळी हा सण प्रकाशाचा समृद्धीचा आणि आनंदाचा हिंदू सण आहे जो दिव्याची रांग या संस्कृत शब्दावरून आला हा सण साधारणपणे पाच दिवसाचा असतो आणि अंधारावर प्रकाशाचा वाईट यावर चांगल्याचा आणि अज्ञानावर ज्ञानाचा विजय दर्शवितो या सणामध्ये घराची स्वच्छता दिव्याची आरास रांगोळी काढणे फराळ बनवणे एकमेकांना वस्तू भेट देणे यासारख्या गोष्टी केल्या जातात दिवाळीचे पाच दिवसाचे महत्त्व पहिला दिवस वसुबारस या दिवशी दिवाळीचा पहिला दिवस त्याला गोवत्सद्वादशी असे म्हणतात या दिवशी गाईची वासराची पूजा केली जाते धनत्रयोदिशी या दिवशी धन आणि आरोग्याची देवता यम याची पूजा केली जाते आणि नवीन वस्तूची खरेदी करण्याची प्रथा आहे नरक चतुर्दशी छोटी दिवाळी या दिवशी नरकासुराचा वध श्रीकृष्णाने केला होता या दिवशी पहाटे अभंग स्नानाला विशेष महत्त्व आहे लक्ष्मीपूजन मुख्य दिवाळी हा दिवस दिवाळी मुख्य लक्ष्मीपूजन दिवस आहे या दिवशी घरात लक्ष्मी आणि कुबेर याची पूजा केली जाते. आश्विन अमावस्येपासून लक्ष्मी कुबेर देवता पृथ्वीवरती भ्रमण करत असतात आणि स्वच्छता सुंदरता ज्या ठिकाणी दिसते सात्विकता ज्या ठिकाणी असते तिथे वास्तव्य करते म्हणून घराची स्वच्छता करण्यास विशेष महत्त्व आहे लक्ष्मीपूजन केल्यामुळे वर्षभर आपल्याला समृद्धी धनप्राप्ती लाभ होत असतो



बलिप्रतिपदा पाडवा या दिवशी विष्णू ने वामन रूप घेऊन बळीराजाला पाताळात गाडले बळीराजाचा स्मरण म्हणून हा दिवस साजरा केला जातो होती असे मानले जाते साडेतीन मुहूर्तापैकी हा अर्धा मुहूर्त आहे .यम द्वितीया या दिवशी यम देव आपली बहीण यमी हिचे अक्षन घ्यायला गेले होते तेव्हापासून भाऊबीज प्रचलित आहे भाऊबीज या दिवशी बहीण आपल्या भावाला ओवाळते आणि भाऊ बहिणीला भेट वस्तू देतो दिवाळीच्या अध्यात्मिक महत्त्व अंधारावर प्रकाशाचा आणि वाईटावर चांगल्याचा विजय दर्शविणारा सण आहे धार्मिक परंपरा दिवाळी अनेक धार्मिक कथेशी जोडलेली आहे जसे की रावणाचा वध करून श्रीरामाचे अयोध्येत परतणे या सणामुळे सामाजिक सण या सणामुळे कुटुंबे एकत्र येतात नातेवाईकांच्या भेटी घेतल्या जातात सामाजिक संबंध दृढ होतो सांस्कृतिक विविधता दिवाळी हा फक्त हिंदूचाच नाही तर शिख जैन धर्माचे लोक यांचाही सण वेगवेगळ्या परंपरेनुसार साजरा करतात पौराणिक माननीयतेनुसार श्री रामाचा १४ वर्षाचा वनवास संपून ते अयोध्येत परत येतात त्यावेळेस मोठ आनंद उत्सव दिवाळी साजरी केली होती तेव्हापासून दिवाळी म्हणून साजरा केला जातो पाडव्याच्या दिवशी पत्नी आपल्या पतीला ओवाळते पतीच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करते रावण वध करून श्रीराम अयोध्येला परतल्यावर जनतेने फटाके फोडून आणि दिवे लावून त्यांचे स्वागत केले होते अशी ही कथा प्रचलित आहे वाईट शक्तीचा नाश आणि आनंद उत्सव साजरा करणे हे फटाके फोडण्याचे कारण आहे सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

## संतोषकुमार राजपूत यांना राज्यकर उपआयुक्तपदी पदोन्नती

**जालना । प्रतिनिधी** - राज्य शासनाच्या वस्तू व सेवा कर विभागातील राज्यकर सहाय्यक आयुक्त संतोषकुमार पद्मसिंग राजपूत यांची राज्यकर उप आयुक्तपदी पदोन्नती झाली आहे.

संतोषकुमार राजपूत यांनी जालना जिल्ह्यात जालना जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षक म्हणून १६ कार्य केले.जालना तालुक्यातील कचरेवाडी येथे ग्राम स्वछता अभियान, स्वच्छ शाळा सुंदर शाळा अशा विविध उपक्रमात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. शिक्षकाची नोकरी सोडून त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन केले. ते राज्य सरकारच्या वस्तू व सेवा कर विभागाच्या मुंबई कार्यालयात अन्वेषण शाखेत राज्यकर सहाय्यक आयुक्त म्हणून कार्यरत आहेत. दिनांक १७ ऑक्टोबर रोजी त्यांना राज्यकर उप आयुक्तपदी पदोन्नती मिळाली आहे. संतोषकुमार राजपूत हे निसर्गकवी दिवंगत ना. धो. महानोर यांच्या अजिंठा लेणी जवळील पळसखेडा येथील मूळ रहिवासी असले तरी त्यांची कर्मभूमी ही जालनाच आहे . राजपूत यांच्या पदोन्नती बद्दल मित्र परिवारातर्फे त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

## माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**जालना** - जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी माजी राष्ट्रपती डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. श्रीमती कुलकर्णी यांनी माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. या प्रसंगी उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी माजी राष्ट्रपती डॉ.कलाम यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

# एकनाथनगर येथे चोरी; पहाटेच्या सुमारास घराचे गेट तोडून एक तोळे सोनं लंपास

**धाकलगांव । प्रतिनिधी** - अंबड तालुक्यातील धाकलगांव शिवारातील शेतवस्तीवर आज पहाटे साडेतीनच्या सुमारास धाडसी घरफोडीची घटना घडली असून अज्ञात चोरट्यांनी घराचे गेट तोडून बेडरूममधील कपाटातील एक तोळे सोन्याचे दागिने लंपास केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

वडीगोद्री येथील जायकवाडी डाव्या कालव्यालगत शेत वस्तीवर राहणारे सुरेश पंडितराव काळे यांच्या घराचे गेट तोडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश केला.त्या वेळी घरातील सदस्य बेडरुममध्ये झोपलेले असताना चोरट्यांनी कपाट उचकून त्यातील एक तोळ्याचे सोन्याचे दागिने चोरून नेले.चोरी करत असताना घरच्यांना काहीसा आवाज ऐकू आला आणि त्यांना जाग आली.मात्र चोरट्यांची भीती वाटल्याने त्यांनी प्रतिकार केला नाही.

विशेष म्हणजे घरातील इतर खोल्यात झोपलेले कुणी बाहेर येऊ नये म्हणून चोरट्यांनी अत्यंत चतुराईने घरातील इतर खोल्यांना बाहेरून कडी लावल्या होत्या.

काही दिवसांपूर्वीच नालेवाडी येथील एका शिक्षकाच्या घरी घरफोडी करून तब्बल १७ तोळे सोनं लंपास करण्यात आले होते.त्या घटनेचा तपास अद्याप लागलेला नाही.त्याच परिसरात पुन्हा घरफोडी झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्थानिक नागरिकांनी गोंदी पोलिसांच्या निष्क्रीयतेवर नाराजी व्यक्त केली असून रात्रीच्या गस्तीत मोठ्या प्रमाणात वाढ करण्याची आणि वाढत्या चोऱ्यांवर आळा घालण्याची मागणी केली आहे.

या घटनेबाबत गोंदी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून,गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे.पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून चोरट्यांचा शोध सुरू केला आहे.

गेल्या काही दिवसांपासून परिसरात संशयास्पद हालचाली दिसत आहेत. पोलिसांनी रात्रीच्या गस्तीत वाढ करून चोरांना वचक दिला पाहिजे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.




# सर्वसामान्य कार्यकर्तेच पक्षाची खरी शक्ती; स्थानिक निवडणुकांमध्ये भाजपा चा विजय निश्चित - आमदार बबनराव लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** आगामी निवडणुकांच्या तयारीसाठी मंडळ पातळीवर बैठका घेऊन बूथ समित्यांचे बळकटीकरण, नवीन सदस्य नोंदणी, प्रशिक्षण, जनसंपर्क मोहिम व घरभेटींवर भर देणार आहोत, असे लोणीकर यांनी सांगितले. सरकारी योजनांची माहिती तळगाळापर्यंत पोहोचवणे, विकासकामांचा आढावा घेणे व जनतेचा विश्वास वाढवणे आवश्यक आहे. कार्यकर्त्यांचे समर्पण व जनतेचा विश्वास हेच विजयाचे रहस्य आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी करून त्यांनी पक्षाच्या यशासाठी कृतीवर भर देण्याचे सूचित केले.

परतूर तालुक्यातील भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीत बोलताना माजी मंत्री, आमदार बबनराव लोणीकर यांनी पक्षाच्या यशाची गुरुकिल्ली कार्यकर्ते असल्याचे सांगितले. भाजप हा कार्यकर्त्यांचा पक्ष असून, प्रत्येक निवडणूक संघटन, नियोजन आणि कार्यकर्त्यांच्या सक्रिय सहभागाने जिंकली जाते, असे ते म्हणाले. येणाऱ्या पंचायत समिती, जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये भाजपच विजयी होईल, यासाठी संघटनात्मक मजबुतीवर भर देणे आवश्यक आहे. कार्यकर्त्यांनी जनतेच्या समस्या सोडवण्यावर लक्ष केंद्रित करावे आणि वर्षभर जनतेशी संपर्कात राहावे, असे आवाहन त्यांनी केले. स्थानिक निवडणुका विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असून, पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, वीज व नोकरीच्या संधींसारख्या समस्या प्राधान्याने सोडवाव्यात. केवळ प्रचारावर अवलंबून राहून चालणार नाही, तर ठोस उपाययोजना आणि पारदर्शक प्रशासन देणे हे भाजपचे धोरण आहे, असे लोणीकर म्हणाले. निवडणुकीत गाफिल राहू नये, प्रत्येक बूथवर कार्यकर्ते सजग राहून जनतेच्या विश्वासाला प्राधान्य द्यावे, असे सल्ला देऊन त्यांनी निवडणूक गांभीर्याने घेण्याचे आवाहन केले. या प्रसंगी भाजपा प्रदेश सचिव राहुलभैया लोणीकर यांच्यासह तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे,



युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले, जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर, सूर्यकांत बरकुले, संभाजी वारे, माणिकराव वाघमारे, सुरेश सोळंके, सुदाम प्रधान, परमेश्वर का, तुकाराम सोळंके, महादेव वाघमारे, बंडू मानवतकर, छाया घोरबांड, रवींद्र सोळंके, मधुकर मोरे, गजानन लोणीकर, सिताराम राठोड, मेराज खतीब, शिवाजीराव घनवट, शिवाजी पाईकराव, शहाजी राखी, रमेश आढाव, रमेश थोरात, मजीब जमीनदार, अर्जुन राठोड, गजानन लिपणे, अण्णासाहेब ढवळे, संदीप बाहेकर, सुधाकर सातोणकर, कृष्णा आरगडे, प्रकाश चव्हाण, संतोष हिवाळे, राजेंद्र वायाळ, तुकाराम बोंनगे, के.डी. भदर्गे, रामजी कोरडे, नाबाजी काळदाते, विश्वंभर शेळके, हनुमान चिखले, अमोल पवार, माऊली सोळंके आदींसह हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.

**पदवीधर मतदार नाव नोंदणी अभियानाला सुरूवात - शिक्षित नागरिकांनी नोंदणी करून लोकशाही बळकट करण्याचे राहुल लोणीकर यांचे आवाहन**

राज्यभर पदवीधर मतदारसंघातील मतदार नोंदणीसाठी विशेष अभियानास सुरूवात झाली असून या अभियानाचा कालावधी ९ ऑक्टोबर २०२५ ते ६ नोव्हेंबर २०२५ असा ठेवण्यात आला आहे. या कालावधीत पात्र पदवीधरांनी आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करून घेण्याचे आवाहन भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुलभैया बबनराव लोणीकर यांनी या वेळी आपल्या भाषणात बोलतांना केले आहे. पुढे बोलताना राहुल लोणीकर म्हणाले की या अभियानात १ नोव्हेंबर २०२२ पूर्वी पदवीधर झालेल्या नागरिकांना नोंदणीस पात्रता असून, गत निवडणुकीत नाव नोंदवलेले असले तरीही पुन्हा नोंदणी करणे बंधनकारक आहे, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. मतदार नोंदणीसाठी अर्जदारांनी नमुना अर्ज क्र.१८, पदवीचे प्रमाणपत्र किंवा अंतिम वर्षाची मार्कशीटची प्रत, पासपोर्ट आकाराचा फोटो, तसेच मतदार ओळखपत्र किंवा आधार कार्डाची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे. नोंदणी प्रक्रिया प्रत्येक तालुक्याच्या तहसील कार्यालयात सुरू असून, अर्ज पूर्ण भरून संबंधित कागदपत्रांसह सादर करायचा आहे. जिल्हा प्रशासनाने यासाठी स्वतंत्र कक्ष तयार केले असून, पात्र पदवीधरांनी शेवटच्या तारखेपूर्वी अर्ज सादर करावा. शिक्षित वर्ग हा समाजाच्या घडामोडींमध्ये निर्णायक भूमिका बजावणारा घटक आहे. म्हणूनच प्रत्येक पदवीधराने मतदार म्हणून नोंदणी करून लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा. हा हक्क आणि कर्तव्य दोन्ही आहे.शिक्षित, जागरूक आणि जबाबदार नागरिकांनी लोकशाही बळकट करण्यासाठी या अभियानात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन राहूल लोणीकर यांनी केले आहे.

## मंठा व परतूर तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी १०० कोटींचा निधी मंजूर -आमदार लोणीकर

परतूर विधानसभा मतदारसंघातील अतिवृष्टी नुकसानीसाठी राज्य शासनाने १०० कोटी रुपयांचा अनुदान निधी मंजूर केला असून, हा निधी डीबीटीद्वारे थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. यावेळी बोलताना लोणीकर यांनी सांगितले की, जालना जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांना वेळेवर मदत मिळाव्यासाठी तातडीने निर्णय घेण्यात आला. मंठा तालुक्यात ७१,३०३ शेतकऱ्यांना लाभ मिळेल तर परतूर तालुक्यात ५३,७३२ शेतकरी लाभार्थी असतील. एकूण १,२५,०३५ शेतकऱ्यांसाठी ९३ कोटी ५ लाख रुपयांचा निधी असून, मंठा व परतूर तालुक्यांत अनुक्रमे ५४,६१४ व ५१,६३१ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. नेर व सेवली सर्कलसाठी ७ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी मंजूर झाला आहे. डीबीटी प्रणालीमुळे मध्यस्थी टाळून पारदर्शक व वेगवान वितरण होईल. पंचनामा पूर्ण झाल्याने लवकरच रक्कम खात्यात जमा होईल, असे सांगून लोणीकर यांनी शेतकऱ्यांच्या संकटकाळी सरकारच पाठबळ असल्याचे अधोरेखित केले.

# धनाढया लोकांचे अतिक्रमण न हटवता गोर गरीब जनतेचे अतिक्रमण काढण्यात आले - महेश नळगे

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर शहरात दि.१५ ऑक्टोंबर रोजी अतिक्रमणे हटविण्याची मोहीम राबविण्यात आली होती. याच अनुषंगाने दि.१६, रोजी उबाठा शिवसेना ठाकरे गट जिल्हा प्रमुख महेश नळगे यांच्या हस्ते परतूर नगर परिषदचे मुख्याधिकारी, गोरे यांना निवेदन देण्यात आले. उपरोक्त विषयी मी आपल्या निदर्शनास अणू इच्छितो एन सना सुधीच्या तोंडावर परतूर शहरातील अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्यात आली.मात्र या मोहिमेमध्ये सर्वसामान्य गरीब नागरिकांचे लहानमोठे झोपडे , रस्त्यांवरील वेवसाय,गाळे, तसेच उपजीविकेचे एकमेव साधन असलेली.ठिकाणे तोडण्यात आली. परंतु त्याच भागात अनेक धनाड्या व प्रभावशाली व्यक्तीनी केलेली मोठ्या प्रमाणावरची अतिक्रमाणे आजही कायम ठेवलेली आहेत. त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. हे वर्तन पूर्णपणे अन्यायकारक व पक्षपाती स्वरूपाचे असून प्रशासनाच्या कारवाईतील दुहेरी निकष स्पष्ट दिसत आहे. या अन्यायामुळे गरीब लोकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. संपूर्ण भागामध्ये समान निकष वापरून अतिक्रमण पाठविण्याची कारवाई करण्यात यावी, धनाड्या व प्रभावशाली लोकांची अतिक्रमणे देखील हटवावीत, गरीब नागरिकांना झालेल्या नुकसानी बाबत मदत व पुनर्वसनाचा विचार करावा, आपण या प्रकरणाची सखोल चौकशी करून न्याय द्यावा. नसता शिवसेना ठाकरे गट स्टाइलने आंदोलन करतील.या निवेदनावर शिवसेना पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या सह्या आहेत.

# जालना माहेश्वरी समाजाचे गुरुवारी दिपावली अन्नकुट आणि स्नेहमिलन

## गीता परिवाराचे संजय मालपाणी यांचे व्याख्यान

**जालना । प्रतिनिधी -** जालना माहेश्वरी समाजाचे दिपावली अन्नकुट व स्नेहमिलन गुरुवार दि. २३ ऑक्टोबर रोजी ज्वॉला लॉन येथे सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आले आहे.


याप्रसंगी प्रसिद्ध वक्ते आणि उद्योगपती संजय मालपाणी, संगमनेर यांचे व्याख्यान होणार होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्रदेशाध्यक्ष श्रीकिशन भंसाली जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांची उपस्थिती राहणार आहे. याप्रसंगी या वर्षीचा माहेश्वरी समाजाचा जीवन गौरव हा सन्मान सेवानिवृत्त शिक्षक ताराचंद मालपाणी यांना प्रदान करण्यात येणार आहे. तत्पूर्वी सकाळी १० ते १२ या वेळेत गुणवंत विद्यार्थी व विशेष पदाधिकार्यांचा सत्कार महेश भवन येथे करण्यात येणार आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ऑयकान स्टीलचे व्यवस्थापकीय संचालक दिनेश राठी व स्टेट टॅक्स इन्स्पेक्टर स्वप्नील इंदाणी हे उपस्थित राहणार आहेत.



या कार्यक्रमास समाज बांधवानी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन जालना माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष विजय गो. राठी, सचिव उमेश बजाज, ओमप्रकाश मंत्री, संजय दाड, विजय राठी, कांतीलाल राठी, सत्यनारायण सारडा, दामोधर बजाज, शिवरतन मुंदडा, पुसाराम जी मुंदडा, अतुल लड्डा, राजेंद्र मंत्री, विनोद बियाणी, सुनिल बियाणी, अमोल बांगड, सुधिर मंत्री, सतिष राठी, आर.आर. मंत्री, महेश सारडा, शिवाभाऊ गट्टाणी, जुगलकिशोर होलाणी, पुरुषोत्तम मुंदडा, शामसुंदर लखोटिया, प्रा. स्वप्नील सारडा, डॉ. आशुतोष सोनी, संतोष सारडा, शैलेश मुंदडा यांनी केले आहे.



शहरात दिवाळीच्या पार्श्वभूमीवर टोपल्या, झाडू व सुपाला मागणी असल्याने या वस्तू बनविताना महिला कारगीर. (छाया - मजहर सौदागर)




# गुणवान आणि चारित्र्यवान चिकित्सकांचे निर्माण हा धन्वंतरी जयंतीचा मुख्य उद्देश - डॉ. अरुण खैरे



**बदनापूर । प्रतिनिधी -** भारत आरोग्य संगठनाने भगवान धन्वंतरी जयंतीच्या निमित्ताने 'धन्वंतरी पुरस्कार सोहळा' १८ ऑक्टोबर रोजी यशस्वीपणे आयोजित केला. यावेळी भारत आरोग्य संगठनाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अरुण खैरे यांनी सांगितले की, संस्थेची आजीवन सदस्यता किंवा सेमिनार, वर्कशॉप इत्यादी सर्व प्रकारच्या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क घेतले जात नाही आणि या संस्थेचा मुख्य उद्देश शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण देणे तसेच आरोग्यासंबंधित ज्ञान जनतेपर्यंत पोहोचवणे हा आहे. कार्यक्रमात डॉ.सुमित श्रीवास्तव आणि डॉ. आदित्यकांत मिश्रा यांना वैद्यकीय क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी सन्मानित करण्यात आले. लखनऊ येथील महेश्वर आयुर्वेद केंद्रावर आयोजित कार्यक्रम धन्वंतरी पूजा आणि प्रसाद वितरणासह संपन्न झाला, ज्यात राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. अजय सिंह,सचिव डॉ. अरविंद गुप्ता, राष्ट्रीय प्रमुख डॉ. स्वप्निल कैथवास, महाराष्ट्र अध्यक्ष डॉ.नितिन वळवी, उपाध्यक्ष डॉ. केतन दांगट, सचिव डॉ. अनूप थूटे,वित्त प्रमुख डॉ. वैशाली गुप्ता आणि महिला शाखा प्रमुख प्रो. आरती सिंह, डॉ. रजनीश कसोधन, डॉ. श्वेता खैरे व डॉ. विभा राणी रत्ना यांचा सक्रिय सहकार्य लाभला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.